**अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: एसएसएन-२००९/(३९२/०९)/माशि-२**
**शिबीर कार्यालय, नागपूर**
**दिनांक : ७० डिसेंबर, २०१०**

वाचा:-१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक: अरजा-२४०१/७/सेवा-९, दिनांक १५ जानेवारी २००१.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक: अरजा-२४०१/८/सेवा-९, दिनांक १५ जानेवारी, २००१.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एसएसएन-१०००/(३३८/०१)/माशि-२ दिनांक ९ एप्रिल, २००१.
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:अरजा-२००९/प्र.क्र.२१/सेवा-६, दिनांक २७ ऑगस्ट, २००९.
५) शासन पूरकपत्र, वित्त विभाग क्रमांक:अरजा-२००९/प्र.क्र.२१/सेवा-६, दि.१० नोव्हें. २००९.

**शासन निर्णय** :- वित्त विभागाचे संदर्भातील शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेले अर्जित रजेचे प्रत्यर्पन, अर्जित रजा साठविणे व त्याचे रोखीकरण करणे यांच्या कमालवार मर्यादा वाढविणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत ते आदेश संदर्भ क्रमांक ३ च्या दिनांक ९ एप्रिल, २००१ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील खाजगी/ प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचा-यांना लागू करण्यात आलेले आहेत.

२. आता संदर्भ क्रमांक ४ येथील वित्त विभागाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार करण्याबाबत काढण्यात आलेले आदेश राज्यातील खाजगी/ प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ज्यांना अर्जित रजा देय आहे त्या संवर्गांना जसेच्या तसे या शासन निर्णयान्वये लागू करण्यात येत आहेत.

३. सदरचे आदेश दिनांक १-१-२००६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त/ निधन झालेल्या शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठी लागू होतील.

४. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मध्ये विद्यमान तरतूदी स्वतंत्रपणे सुधारण्यात येत आहेत.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ संदर्भ क्र.३२१/सेवा-६, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१० चे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

mycom/f/vij/mashi-2/gr

६.  सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्यां संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१०१२१०२१०७४८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. चं. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य./ प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक)
शिक्षण निरीक्षक (उत्तर/ दक्षिण/ पश्चिम) मुंबई.
सर्व लेखा अधिकारी (शिक्षण विभाग)
महालेखापाल १/२, (लेखा परिक्षा) मुंबई/ नागपूर.
महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
मुंबई लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद.
वित्त विभाग/ नगर विकास विभाग/ ग्राम विकास विभाग/ समाज कल्याण विभाग/ आदिवासी विकास विभाग/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती (माशि-२)